# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक १४/०४/२०२६ (मंगळवार )**

---

## पोलीस ठाणे उमरेड हद्दीतील गरडेपार शिवारात अवैधरित्या मोहाफुल गावठी हातभट्टीची दारू काढणाऱ्या आरोपींवर गुन्हा नोंद, २१ हजार ३०० रूपयांचा मुद्देमाल जप्त उमरेड पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन उमरेड:—** दिनांक १३/०४/२०२६ रोजी संध्याकाळी १९:३० वाजेच्या सुमारास उमरेड पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, मौजा गरडेपार शिवारात अवैधरित्या रनिंग भट्टी द्वारे मोहाफुल गावठी काढत आहे. मिळालेल्या माहीती च्या आधारे पोलीस पथकाने नमुद घटनास्थळी जावुन धाड टाकुन कारवाई केली असता दोन इसम हातभट्टी लावुन दारू गाळतांना दिसुन आले. पोलीसांनी पाहुन दोन्ही इसम पळुन गेले. पळुन गेलेल्या आरोपींची नावे **१) मोरधन राजेराम राजपूत, वय ५० वर्ष आणि २) आतेश पुरूषोत्तम राजपूत, वय ३८ वर्ष, दोन्ही रा. गरडेपार** असे असल्याची माहीती पोलीसांना प्राप्त झाली.

पोलीसांनी रनिंग भट्टी नष्ट करून घटनास्थळावरून ३१० किलोग्रॅम मोहाफुल सडवा आणि २८ लिटर मोहाफुल गावठी दारू, रनिंग भट्टी चे साहीत्य लोखंडी जळाउ लाकुड ,पाईप आणि इतर असा एकुण २१,३००/— रूपयांचा **जप्त केला. नाशवंत मुद्देमाल मौक्यावर पंचनामा कार्यवाही करून नष्ट करण्यात आला. नमुद २ आरोपींविरुद्ध महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमान्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे.**



## अस्तित्व लपवुन गुन्हा करण्याच्या उद्देशाने फिरणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा नोंद

**पोलीस स्टेशन पाचगाव :—** दिनांक १३/०४/२०२६ रोजी पाचगाव पोलीस अवैध धंदयावर कारवाई करणेकामी पेट्रोलींग करीत असता मौजा कळमना परिसरात **आरोपी नामे अविनाश वानोसा गेडाम, वय ५५ वर्ष, रा. हनुमान वार्ड कन्हाड गाव (सोमनाळा), ता. पवनी, जि. भंडारा** हा स्वत:चे **अस्तित्व** लपवुन सुर्यास्तानंतर आणि सुर्योदयाच्या पुर्वी फिरतांना मिळुन आला. पोलीसांनी त्यास विचारपुस केली असता त्याने उडवा उडवीची उत्तरे दिली. नमुद आरोपी हा दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने वावरतांना मिळुन आल्याने आरोपीचे विरूध्द पोलीस स्टेशन पाचगाव येथे कलम १२२ महाराष्ट्र पोलीस अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

## अंमली पदार्थाचे सेवन करणाऱ्या आरोपीविरूध्द एन.डी.पी.एस कायदयान्वये गुन्हा नोंद

**पोलीस स्टेशन नरखेड:—** दिनांक १३/०४/२०२६ **रोजी** नरखेड पोलीस पेट्रोलींग करीत असतांना **आरोपी गंगाधर पुंडलिक नासरे, वय ६८ वर्ष, रा. वार्ड क्र. २, बेलोना त. नरखेड** हा मौजा पाताळेश्वर मंदिर बेलोना येथे सार्वजनिक ठिकाणी अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आला. नमुद आरोपीवर कलम २७ एन.डी.पी.एस. कायदयान्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

## अवैधरित्या विनापरवाना दारू काढणारे, दारू बाळगुण विक्री करणाऱ्या तसेच सेवन करणाऱ्या,आरोपीतांविरूद्ध ०९ गुन्हे नोंद

दिनांक १३/०४/२०२६ रोजी दारूबंदी कायदा अंतर्गत विविध पोलीस स्टेशनला पोलीसांनी अवैधरित्या दारू बाळगुन विक्री करणाऱ्यांवर छापा टाकुन मोहाफुल दारू, मोहाफुल सडवा, ताडी तसेच इतर साहित्य असा एकुण १९,४००/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला. महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम अन्वये एकुण ०९ गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

**पोलीस स्टेशन खापा** येथे आरोपी नामे विजय चंद्रभान खंडाते, वय ३६ वर्ष, रा. कोरमेटा, ता. सावनेर, जि. नागपुर याचे वर ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन जलालखेडा** येथे आरोपी नामे १) सतिश पांडूरंग जैस्वाल, वय ३८ वर्ष, रा. मेंढला, ता. नरखेड, जि. नागपूर २) महिला आरोपी ३) कमलसिंग प्यारेलाल कूमेरिया, वय ४० वर्ष, रा. मायवाडी, ता. नरखेड, जि. नागपूर याचेवर प्रत्येकी १ असे ०३ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन काटोल** येथे आरोपी क्र. १) दत्ता विठ्ठलराव धवड, वय ४० वर्ष, रा. शारदा चौक, काटोल २) सुशिल अंबादास कोटजावळे, वय २६ वर्ष, रा. नचसारी चौक अमरावती ३) गौरव रविंद्र वनकर, वय २६ वर्ष, रा. वाढोणा ता. काटोल यांचे वर ०१ गुन्हा नोंद, तसेच आरोपी सिनु नारायण कोडगलवार, वय २६ वर्ष, रा. सरस्वती नगर, नेहरू बाजार काटोल याचेवर ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन उमरेड** येथे आरोपी नामे खुशाल तबाबुराव नान्हे, वय ६० वर्ष, रा. दत्त

मंदीर जवळ ईतवारीपेठ उमरेड याचेवर ०१ गुन्हा नोंद, तसेच आरोपी क्र. १) मोरधन राजेराम राजपूत, वय ५० वर्ष, २) आतेश पुरूषोत्तम राजपूत, वय ३८ वर्ष, दोन्ही रा. गरडेपार यांचेवर ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन देवलापार** येथे आरोपी नामे दसरथ भैयालाल सोनवाने, वय २९ वर्षे, रा. पथरई, तह. रामटेक याचेवर ०१ गुन्हा नोंद, अशा १२ आरोपीतांवर महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमान्वये ०९ गुन्हे दाखल केले आहे.

**नमुद कारवाईत एकुण १) ६७ लिटर मोहाफुल गावठी दारू २) ३१० किलो मोहाफुल सडवा ३) ३० लिटर ताडी तसेच इतर साहित्य असा एकुण १९,४००/— रूपयांचा मुद्देमाल मिळून आल्याने नाशवंत मुद्देमाल मौक्यावर पंचनामा कार्यवाही करून नष्ट करण्यात आला.**

## नागपुर ग्रामीण जिल्ह्यातील ६९८ रेकॉर्डवरील आरोपीतांची घेण्यात आली आरोपी परेड

मा. श्री हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनात आज दिनांक १४/०४/२०२६ रोजी नागपुर ग्रामीण जिल्हयातील २२ पोलीस स्टेशनला शरीराविरूध्दचे गुन्हे करणारे, मालमत्ते विरूध्दचे गुन्हे करणारे, महीला व बाल अत्याचार गुन्हेगार ,अवैध दारू, जुगार इतर अवैध धंदयामधील रेकॉर्डवरील आरोपींतांची आरोपी परेड घेण्यात आली आहे. **एकुण ६९८ आरोपीतांची आरोपी परेड घेण्यात आली आहे.**

**नागपुर उपविभाग** :— नागपुर उपविभागातील पोलीस स्टेशन बुट्टीबोरी येथे ३४ आरोपी, पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी येथे ३० आरोपी आणि पोलीस स्टेशन बेला येथे ३३ आरोपी अशा एकुण ९७ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**उमरेड उपविभाग** :— उमरेड उपविभागातील पोलीस स्टेशन उमरेड येथे ३७ आरोपी , पोलीस स्टेशन कुही येथे ३० आरोपी आणि पोलीस स्टेशन भिवापुर येथे २५ आणि पोलीस स्टेशन वेलतुर ३० आरोपी अशा एकुण १२२ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**सावनेर उपविभाग :—** सावनेर उपविभागातील पोलीस स्टेशन सावनेर येथे ३१ आरोपी , पोलीस स्टेशन कळमेश्वर येथे ३० आरोपी आणि पोलीस स्टेशन खापा येथे २८ आरोपी आणि पोलीस स्टेशन केळवद येथे ३० आरोपी अशा एकुण ११९ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**कन्हान उपविभाग** :— कन्हान उपविभागातील पोलीस स्टेशन कन्हान येथे ३४ आरोपी , पोलीस स्टेशन मौदा येथे १५ आरोपी पोलीस स्टेशन वडोदा येथे १४ आरोपी अशा एकुण ६३ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**रामटेक उपविभाग :—** रामटेक उपविभागातील पोलीस स्टेशन रामटेक येथे ५२ आरोपी , पोलीस स्टेशन पारशिवणी येथे ३४ आरोपी, पोलीस स्टेशन अरोली येथे २४ आरोपी आणि पोलीस स्टेशन देवलापार येथे २५ आरोपी अशा एकुण १३५ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**काटोल उपविभाग :—** काटोल उपविभागातील पोलीस स्टेशन काटोल येथे ६२ आरोपी , पोलीस स्टेशन कोंढाळी येथे ३० आरोपी आणि पोलीस स्टेशन नरखेड येथे ३९ आरोपी आणि पोलीस स्टेशन जलालखेडा येथे ३१ आरोपी अशा एकुण १६२ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**(सर्व ६ उपविभागातील २२ पोलीस स्टेशन येथे एकुण ६९८ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे. )**



मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने